# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** कळंब

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0507 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/12/2023 21:53

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 02/12/2023

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/12/2023

**Time From (वेळेपासून):** 12:33 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/12/2023 **Time (वेळ):** 21:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 043

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/12/2023 21:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, .1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आरोपीचे राहते घर, गांधी नगर कळंब,कळंब

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अभिषेक मारूती पाचभाई

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2001

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वाणेबाडी,कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वाणेबाडी,कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9834556173

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष बाबुराव हुरगट | | | 1. कषी अधिकारी,तालुका कषीअधिकारी,मंडळ कषी अधिकारी येरमाळा ,गांधी नगर कळंब,कळंब,कळंब , उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रु दराच्या 40 नोटा | 20,000.00 |



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 02.12.2023

मी अभिषेक मारुती पाचभाई, वय 22 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. वाणेवाडी ता. कळंब जि. धाराशिव मोबाईल नंबर 9834556173

मी आज दिनांक 01/12/2023 रोजी पोलीस ठाणे कळंब येथे श्री. नानासाहेब कदम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांचे समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन माझे नावे मौजे चोराखळी येथे गट क्रं. 73 मध्ये शेत जमीन आहे.

माझे चोराखळी येथील शेतजमीन गट नंबर 73 मध्ये शासनाकडुन कृषी विभाग मार्फत राबवीलेल्या राष्ट्रीय एकात्मीक फलोत्पादन विकास अभियान 2023-2024 अंतर्गत मला सामुहिक शेततळे जुलै 2023 मध्ये मंजुर झाले. सदर शेततळ्याचे काम पुर्ण झाले आहे. सदर कामाची मोका तपासणी करणेसाठी दिनांक 24/11/2023 रोजी मंडळ कृषी अधिकारी श्री. हुरगट व कृषी पर्यवेक्षक माळी हे दिनांक 24/11/2023 रोजी चोराखळी येथे आले. व माझे गट क्रं. 73 मधील शेततळ्याचे कामाची पाहणी केली. त्यानंतर श्री. हुरगट साहेब यांनी मला सदर शेततळयाच्या कामाचे अंदाज पत्रक / इस्टीमेट हे तयार करुन ते अंदाज पत्रक अपलोड करुन अनुदान मंजुरीस पाठविण्यासाठी व लाभार्थीच्या कागदपत्रावर सहया करण्यासाठी माझ्याकडे 20,000/- रुपयेची मागणी केली. मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नाही म्हणुन मी दिनांक 30/11/2023 रोजी मा. पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि. धाराशिव यांचे नावे ऑनलाईन तक्रारी अर्ज केला. सदर तक्रारी अर्जावर मला दिनांक 01/12/2023 रोजी ला.प्र. वि. धाराशिव येथे बोलावण्यात आले त्यावेळी मी माझी सविस्तर तक्रार श्री. म्हेत्रे साहेब यांना सांगितली.
मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 01/12/2023 रोजी श्री. कदम साहेब, पोलीस निरीक्षक, हे पंच व सापळा पथकासह कळंब - ढोकी जानारे रोड वरील मोहेकर कॉलेज येथे सुरक्षीत ठिकाणी आले. त्यावेळी पोनि कदम यांनी मंडळ कृषी अधिकारी हुरगट साहेब हे माझ्याकडे माझे कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मंडळ कृषी अधिकारी हुरगट साहेब यांचे कार्यालयात मी व पंच क्र.01 देशमुख यांना पाठवुन लाचमागणी पडताळणी करणार असल्याचे कळविले. त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी लाच मागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली. आणी मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री. कदम साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन व्हाईस रेकॉर्डचे प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर श्री. कदम साहेब यांचे सुचनेनुसार पो.ना. शेवाळे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाच्या आतमध्ये बणीयनला पीनच्या साहाय्याने अडकविले आणि सापळा पथक थांबलेले ठिकाण कळंब - ढोकी जानारे रोड वरील मोहेकर कॉलेज येथील मैदानातुन पंच क्रमांक 1 देशमुख यांना माझे सोबत पाठवुन 16.06 वाजता च्या सुमारास लोकसेवक हुरगट यांची त्यांचे कृषी अधिकारी कार्यालय कळंब येथे भेट घेण्यासाठी माझे मोटारसायकल वरुन रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 हे माझे मोटार सायकलवरुन लोकसेवक हुरगट यांचे कृषी अधिकारी कार्यालय कळंब येथे गेलो व त्यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक हुरगट साहेब व माझेत शेततळयाचे कामाचे अनुशंगाने बोलणे झाले. त्यावेळी हुरगट यांनी माझे सामुहिक शेततळयाचे इस्टीमेट / अंदाज पत्रक बनवुन ते अपलोड करुन अनुदान मंजुरीस पाठविण्यासाठी माझेकडे 20,000 /- रुपये लाचेची मागणी केली. व सदरची लाच रक्कम त्यांचे फोन पे वर टाकण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येवुन घडलेली हकीकत पंच क्रं 02 यांचे समक्ष पो.नि. कदम यांना सांगितली. त्यानंतर पो.नि.कदम यांनी माझेत व लोकसेवक हुरगट यांचेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषन ऐकले. एकंदरीत लोकसेवक हुरगट साहेब यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान शेततळ्याचे अंदाज पत्रक तयार करुन ते अपलोड करुन अनुदान मंजुरीस पाठवीण्यासाठी 20,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पो.नि. कदम यांनी मंडळ कृषी अधिकारी हुरगट साहेब यांचे विरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन



Scanned with CamScanner

करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी पोनि कदम यांनी मला फोन पे वर 20,000/- रुपये आहेत का ? असे विचारले असता माझ्या फोन पे वर 20,000/- रुपये नसल्याचे सांगितले. मी उदया पर्यंत 20,000/- रुपयाची तजवीज करतो त्यानंतर सापळा कार्यवाही करावी असे सांगितले. त्यानंतर मी श्री. हुरगट साहेब यांनी मागीतलेली 7/12, 8 अ, आधारकार्ड, पासबुक ची कागदपत्रे श्री. हुरगट यांचे मोबाईल क्रं. 7588339733 चे व्हॉटसऍपवर माझे मोबाईल क्रं. 9834556173 चे व्हॉटसऍपवरुन पाठविली.व फोन करुन हुरगट साहेब यांना कागदपत्र पाठविले बाबत फोन करुन सांगितले. त्यावेळी त्यांनी मला उदया येण्यास सांगितले.

त्यान्तर आज दिनांक 02/12/2023 रोजी सकाळी मला पोनि कदम यांनी फोन करुन कार्यवाही संदर्भाने विचारणा केली असता मी त्यांना पैश्याची तजवीज झाली असल्याचे कळविले. त्यावर पोनि कदम यांनी सापळा पथकासह कळंब येथे 11.30 वा पर्यंत येतो असे सांगुन मला कळंब - ढोकी रोडवरील मोहेकर कॉलेज येथील मैदानात सुरक्षीत ठिकाणी येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी 11.40 वा. सुमारास मोहेकर कॉलेज, कळंब येथे पोहचलो. तेथे पोनि कदम व सापळा पथक हजर होते. त्यावेळी मी पोनि कदम यांना विनंती केली की, रोख रक्कम 20,000/- रुपये माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे आपण रोख रक्कमेसह पाठवुन सापळा कार्यवाही करावी अशी विनंती केली.

त्यानंतर पो.नि. कदम यांनी पंच व माझ्याशी चर्चा करुन रोख रक्कम माझे सोबत पाठवुन सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. पोनि कदम यांनी लोकसेवक हुरगट यांचे मागणी प्रमाणे लाचेच्या सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात येणार असुन सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे मला व पंचाला सांगितले.त्यानंतर पोनि कदम यांचे सुचनेवरुन पोशि आचार्य यांनी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्प बाबत मला व पंचाना माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. पो.नि. कदम यांनी नियोजित कारवाईचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईसाठी लागणारी आवश्यक रोख रक्कम 20,000/-रु. पो.नि. कदम यांचेकडे हजर केले. पो.नि. कदम यांचे सुचने नुसार पोशि आचार्य यांनी 20,000/-रु. ज्यामध्ये 500/-रु दराच्या 40 नोटाचे नंबर व वर्णन पंच क्रमांक 2 लोमटे यांचे करवी नमुद करुन घेतले. त्यानंतर पोशि आचार्य यांनी कापसाच्या बोळ्याने लाचेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे अंगावरील पँन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. पोनि कदम यांनी मला लोकसेवक यांनी लाच स्विकारल्या नंतर शर्टाच्या हाताच्या गुडाळलेल्या बाहया काढुन बटन लावण्याचा इशारा नेमुन दिला. व सापळा पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर लोकसेवक श्री. हुरगट यांचे भेटीचे ठिकाण निश्चीत करण्यासाठी पोनि कदम यांचे सुचणे वरुन मी माझे मोबाईल क्रं. 9834556173 वरुन श्री. हुरगट यांचे मोबाईल क्रं. 7588339733 वर स्पीकर ऑन करुन फोन केला त्यावेळी श्री. हुरगट यांनी मला त्यांचे कळंब येथील राहते घराचा पत्ता व लोकेशन पाठवितो तेथे येण्यास सांगितले. पोनि कदम यांचे सुचनेवरुन पोना / शेवाळे यांनी सदरचे फोनवरील संभाषन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व्दारे मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले आहे. त्यानंतर पोनि कदम यांनी सदरचे फोनवरील संभाषण एकुन माझेकडे लाचेची रक्कम देवुन पंच क्र.01 यांचेसह लोकसेवक यांचे घरी पाठवुन सापळा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कळविले.

त्यानंतर पो.नि. कदम यांचे सुचनेवरुन पोना / शेवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन एका छोटया कापडी पिशवीत ठेवुन माझे शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन बनियानचे आतमध्ये सुरक्षीत ठेवुन मला व पंच क्र.01 यांना लोकसेवक हुरगट यांचे राहते घरी रवाना केले.व पो.नि. कदम हे सापळा पथकासह आमचे पाठोपाठ आले.मी व पंच क्रमांक 1 माझे मोटार सायकलवरुन लोकसेवक यांचे गांधी नगर, कळंब येथील राहते घरी गेलो. तेथे माझे व श्री. हुरगट साहेब यांचेत कामाच्या अनुषंगाने बोलने झाले. तेथे हुरगट साहेब यांनी माझेकडून बँक खाते, पालेभाज्या, व फळबागा विषयी इतर माहिती घेतली. त्यानंतर अंदाजपत्रक / प्रस्ताव तयार करुन माझेकडे दिला व त्यावर त्याचे दोन झेरॉक्स काढण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी मला हाताच्या बोटाने पैश्या संबंधी खुनवुन इशारा केला. त्यावेळी मी त्यांना अं.. काल म्हणाला होताव ती आणलेत सोबत अरो सांगितले. त्यावेळी लोकसेवक हुरगट यांनी हं.. जमतय की.. असे म्हणुन उजवा हात पुढे केला. म्हणुन मी लाच रक्कम माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशातून उजव्या हाताने काढुन लोकसेवक हुरगट यांचे समोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन अंगावरील नाईट पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी व पंच त्यांचे घरातुन बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अश्या प्रकारे माझे शर्टच्या हाताच्या गुडाळलेल्या बाहया काढुन बटन लावुन लाच स्विकृतीचा इशारा केला. ती वेळी साधारण 13.00 वा.सुमारास होती. त्यानंतर तात्काळ पो.नि.कदम साहेब, सापळा पथक व पंच क्र. 02 असे तेथे आले. त्यावेळी पोलीस अंमलदार पोना /शेवाळे यांनी माझे कडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केले. त्यांनतर मी, पो.नि.कदम साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे लोकसेवक हुरगट यांचे घरात गेलो. तेथे कदम साहेब यांनी पंच क्रमांक 1 देशमुख यांना तक्रारदार यांचेकडे कोणी लाच मागुन



Scanned with CamScanner

स्विकारली याबाबत विचारणा केली. त्यावेळी पंच क्रमांक 01 देशमुख यांनी लोकसेवक श्री. हुरगट यांचेकडे हाताने इशारा करुन सांगितले की, हेच ते लोकसेवक हुरगट असुन त्यांनीच माझे समक्ष तक्रारदार यांचेकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन 20,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन त्यांचे अंगावरील नाईट पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवेली आहे. असा खुलासा केला. त्यानंतर पो.नि.कदम साहेब यांनी श्री. हुरगट यांना स्वत:चा परिचय करुन दिला व त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव संतोष बाबुराव हुरगट, वय 50 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब, अतिरीक्त पदभार - मंडळ कृषी अधिकारी येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव असे सांगितले. त्यानंतर कदम साहेब यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार तावसकर यांनी लोकसेवक हुरगट यांचे दोन्ही हात धरुन ठेवले व कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हॉईलेट लॅम्पच्या प्रकाशात चेक केले. त्यानंतर पो.नि.कदम यांनी लोकसेवक हुरगट यांना लाचेची रक्कम कोठे आहे असे विचारले असता, लोकसेवक हुरगट यांनी लाच रक्कम अंगावरील नाईट पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशातुन पंचासमक्ष काढुन दिली. सदरच्या रक्कमेच्या चलनी नोटांची पंचाकरवी पडताळणी केली असता त्या नोटांचे नंबर पंच क्रमांक 02 यांचेकडील सापळा कारवाई वेळी लिहुन ठेवलेल्या नंबरशी तंतोतंत जुळून आले. त्यानंतर तेथे पुढील योग्य ती कारवाई करण्यात आली. त्यानंतर लोकसेवक हुरगट यांना शासकीय वाहनाने कळंब पोलीस स्टेशन येथे आणले. तेथे पुढील योग्य ती कारवाई करण्यात आली.

तरी लोकसेवक संतोष बाबुराव हुरगट, वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब, अतिरीक्त पदभार -मंडळ कृषी अधिकारी येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव यांचे विरुध्द मी दिनांक 01/12/2023 रोजी दिलेल्या तक्रारी वरुन दिनांक 01/12/2023 रोजी लाचमागणी पडताळणी व दिनांक 02/12/2023 रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक संतोष बाबुराव हुरगट यांनी मला राष्ट्रीय एकात्मीक फलोत्पादन विकास अभियान 2023-2024 अंतर्गत मंजुर सामुहिक शेततळ्याचे इस्टीमेट / अंदाज पत्रक बनवुन ते अपलोड करुन अनुदान मंजुरीस पाठविण्यासाठी व कागदपत्रावर सही करण्यासाठी 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची 20,000/- रुपये लाच रक्कम आज दिनांक 02/12/2023 रोजी 13.00 वाजताचे सुमारास सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक श्री. हुरगट यांनी त्यांचे राहते घरी गांधी नगर, कळंब येथे स्वत: स्विकारली आहे. म्हणुन माझी संतोष बाबुराव हुरगट, वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब, अतिरीक्त पदभार - मंडळ कृषी अधिकारी येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे लॅपटॉवर टंकलिखीत करुन त्यांची प्रिंट काढून मला वाचण्यास दिली. ती मी वाचुन पाहिली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

SURESH NAMDEVRAO SABALE(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, कळंब
जि.धाराशिव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SURESH NAMDEVRA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**



Scanned with CamScanner